# नाशिक महानगरपालिका, नाशिक येथे स्थापत्य अभियंता (CLTC) तांत्रिक पद प्रधानमंत्री आवास योजनेकरीता १ पद पूर्णतः कंत्राटी पध्दतीने भरण्याची जाहिरात.

नाशिक महानगरपालिका, नाशिक करीता खालील नमूद विधी अधिकारी हे पद ११ महिन्याचे करारावर पुर्णतः कंत्राटी पध्दतीने भरावयाचे आहे.

| अ.क्र. | पदनाम | पदसंख्या | एकत्रित अनुज्ञेय मासिक वेतन |
|---|---|---|---|
| 1 | स्थापत्य अभियंता (CLTC) तांत्रिक पद प्रधानमंत्री आवास योजना | 1 | 70,000/- |

अर्ज करण्याची पध्दत :

1. स्थापत्य अभियंता (CLTC) तांत्रिक या पदासाठी करावयाचा अर्ज आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक राजीव गांधी भवन, शरणपूर रोड, नाशिक ४२२००२ यांचे कार्यालयात किंवा पोष्टानं दि. 05/08/2022 ते दि. 11/०8/२०22 पर्यंत १०.०० ते १8.०० वाजे पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावेत. शासकीय सुट्टीचे दिवशी कार्यालयात अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत.
2. अर्जाचा नमूना सोबत जोडला आहे. सदर अर्ज लिफाफ्यात घालून लिफाफ्यावर उजव्या बाजूस ठळक अक्षरात स्थापत्य अभियंता (CLTC) तांत्रिक पदासाठी अर्ज असे नमूद करावे.
3. या कार्यालयात दि. 11/08/2022 रोजी १८.०० वाजे नंतर अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत तसेच पोष्टाने दि. 11/08/2022 पर्यंतचे १८.०० वाजेनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.
4. अर्जाचा नमूना www.nmc.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आलेला आहे. सदर अर्जाचा नमूना डाऊनलोड करुन अर्ज परिपुर्णरित्या भरावा.

स्थापत्य अभियंता (CLTC) तांत्रिक या पदाकरीता शैक्षणिक अर्हता वय व अनुभव :

1. सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकीमधील स्पेशलायझेशनसह स्थापत्य अभियांत्रिकीमध्ये पदव्युत्तर किंवा पदवीधर असलेला असेल.
2. सरकारी/ निमशासकीय/ स्वायत्त संस्था/ प्रतिष्ठित खाजगी कंपनीत कमीत कमी ३ वर्षांचा अनुभव असलेला असावा. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये अभियंता म्हणून पूर्वीचा अनुभव असल्यास त्याचा प्राधान्यक्रमाने विचार करण्यात येईल.
3. स्थापत्य अभियंता (CLTC) तांत्रिक पदांसाठी पायाभूत सुविधांच्या कामांची खरेदी, रचना आणि पर्यवेक्षण यामध्ये किमान ३ वर्षांचा अनुभव असल्यास प्राधान्य.
4. गुणवत्ता आणि देखरेख अनुपालन सुनिश्चित करण्यासाठी मानके आणि प्रक्रिया सेट करण्यासाठी महानगरपालिकेला मदत करण्याची क्षमता असलेला असेल
5. उमेदवारास मराठी/ हिंदी / इंग्रजी या भाषांबरोबर संगणकीय ज्ञान आवश्यक आहे.
6. स्थापत्य अभियंता (CLTC) पदासाठी उमेद्वाराचे वय नियुक्तीचे वेळी (4०) वर्षापेक्षा जास्त नसेल.

जाहिराती नुसार नेमणूक करण्यात येणाऱ्या स्थापत्य अभियंता (CLTC) या पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या :

1. कामाची तपासणी करणे,बांधकाम परवानगीनुसार काम सुरू आहे किंवा नाही हे तपासणे
2. भुवन ॲप्लीकेशन वर जिओ टॅगींग करणे
3. PFMS प्रणालीवरून लाभार्थ्यांना हप्ता देणे, MPR भरणे व वेळोवेळी उपयोगिता प्रमाणपत्र मा. शासनास सादर करणे.
4. वेळोवळी मा. केंद्र व राज्य शासनाकडून घेण्यात येणाऱ्या बैठकींस आवश्यक माहितीसह उपस्थित राहणे.
5. शहराचा कृती आराखडा, DPR यांच्या समन्वयाने मा. शासनाचे राज्यस्तरीय तांत्रिक कक्षात कागदपत्रे वेळेवर सादर करणे, सुनिश्चित करणे.
6. चालू असलेल्या तांत्रिक संस्थांशी संलग्न करण्यात तांत्रिक सहाय्य प्रदान करणे, पायाभूत सुविधांच्या कामांची रचना आणि पर्यवेक्षण आणि चांगल्या दर्जाची खात्री करणे.
7. शहराच्या कृती आराखड्याचे आणि डीपीआरचे अचूक आणि तपशीलासाठी पुनरावलोकन करणे आणि आवश्यकतेनुसार अभिप्राय देणे.
8. बांधकामाच्या प्रगतीबद्दल अचूकपणे अहवाल देण्यासाठी महानरगपालिकेला मदत करणे आणि HFA अंतर्गत निधीचा योग्य वापर करणे बाबत मार्गदर्शन करणे.
9. मा. आयुक्त तथा प्रशासक अथवा वरीष्ठांकडून वेळोवेळी सोपविण्यात येणारे कामकाज करणे.

अटी व शर्ती :

1. महाराष्ट्र शासन गृह निर्माण विभाग शासन निर्णय क्र. प्रआयो.२०१५ /प्र. क्र.११०/ग्रुनिधी २(सेल) दिनांक ०९/१२/२०१५ अन्वये सदरची नेमणूक ही फक्त प्रधान मंत्री आवास योजने करिता कंत्राटी तत्त्वावर ठोक वेतनावर असून त्याचा नाशिक महानगरपालिकेच्या नियमित आस्थापनेशी कोणत्याही प्रकारचा संबंध राहणार नाही. सदर योजना बंद झाल्यास अथवा काम पूर्ण झाल्यास महाराष्ट्र शासन निर्णय एस आर व्ही - २०१७/प्र क्र ४५५/ कार्या. १२ दिनांक ०९/१२/२०१८ मधील तरतुदीनुसार अथवा प्रशासकीय कारणास्तव नियामाप्रमाणे सेवा संपुष्टात येईल. सेवेत कायम करणे बाबत कोणत्याही प्रकारचा हक्क सांगता येणार नाही.
2. झोपडपट्टी सुधारणा विभाग, महानगरपालिका नाशिक अंतर्गत भरण्यात येणाऱ्या उमेदवाराची निवड मुलाखत पध्दतीने करण्यात येईल.
3. केवळ गुणांकित व सूचीबद्ध उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलाविले जाईल. सदरचे पद हे निव्वळ मानधन तत्वावर भरावयाचे आहे. सुरुवातीस निवड झालेल्या उमेदवारास ६ महिन्यासाठीतात्पुरत्या स्वरुपात कामाचे आदेश देण्यात येतील. उमेदवाराची कामगिरी समाधानकारक असेल व योजनेची आवश्यकता असेल तरच विस्तारीत केले जाऊ शकते. अन्यथा उमेदवाराची सेवा संपुष्टात आणण्यात येईल.
4. मुलाखतीस पात्र उमेदवारांनी मुळ प्रमाणपत्रे व सर्व प्रमाणपत्रांची साक्षांकित सत्यप्रतीसह मुलाखतीस स्वखर्चाने खालील कागदपत्रांसह उपस्थित रहावे. पासपोर्ट साईज फोटो - २, आधारकार्ड झेरॉक्स - २, पॅनकार्ड झेरॉक्स् २ अनुभव प्रमाणपत्र व इतर कागदपत्रे

5. उच्च शैक्षणिक अर्हता व अनुभव धारण करणाऱ्या उमेदवार यांना प्राधान्य देणेत येईल.
6. उमेदवारांनी कुठल्याही प्रकारचा राजकीय दबाव आणल्यास त्यांना मुलाखतीस व नियुक्तीस अपात्र ठरविण्यात येईल.
7. जर कमी प्रमाणात अर्ज आले तर निवडोसाठी निकष कमी होऊ शकतो.
8. नियुक्तीचे आदेश प्राप्त झाल्या नंतर रुजू अहवाल मा. प्रशासक तथा आयुक्त नाशिक महानगरपालिका यांच्याकडे त्वरीत सादर करणे अनिवार्य आहे
9. आपणास नोडल अधिकारी तथा उप आयुक्त (अतिक्रमण/स्लम) यांचे नियंत्रणाखाली काम करावयाचे आहे.
10. उमेदवाराने केलेल्या दैनंदिन कामकाजाचा अहवाल सदर योजना प्रमुख नाशिक महानगरपालिका यांचेकडे ठेवावा
11. पंतप्रधान आवास योजना संबंधी उत्कृष्ट अंमलबजावणी आपणास वरिष्ठांनी दिलेल्या सूचनेनुसार व केंद्र/ राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार करणे बंधनकारक राहील.
12. पंतप्रधान आवास योजने अंतर्गत केलेल्या कामाचे दस्ताऐवजीकरण अद्यावत करणे तसेच कार्यालयीन कामकाजकरिता विभाग/शहर स्थरावरील बैठकीना उपस्थित राहणे बंधनकारक राहील.
13. कामकाज करतांना कोणत्याही प्रकारचा अपघात/वित्तहानी/जीवितहानी झाल्यास अपघाता संबंधी कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई या कार्यालयामार्फत अनुद्येय राहणार नाही.
14. आपणांस प्राप्त होणारी कार्यालयीन कागदपत्रे, दस्तऐवज, माहिती व आधार सामुग्री बाबत गोपनीयता बाळगणे बंधनकारक राहील.
15. आपल्यावर कोणत्याही प्रकारचा फौजदारी गुन्हा दाखल असल्यास/झाल्यास आपली नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल.
16. नियुक्तीच्या कालावधीत आपण कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन केल्यास आपली नियुक्ती कारण न देता तात्काळ रद्द करण्यात येईल
17. नियुक्तीबाबतचा अंतिम अधिकार मा. आयुक्त तथा प्रशासक सो नाशिक महानगरपालिका, नाशिक यांनी राखुन ठेवला आहे.
18. शैक्षणिक अर्हता अनुभव व अर्हतेबाबत अन्य प्रमाणपत्र /कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील, तसेच मुलाखतीस पात्र केल्यास मुलाखतीच्या वेळेस मुळ कागदपत्रे सादर करणे बंधनकारक राहील

सही/-
प्रशासक तथा आयुक्त
नाशिक महानगरपालिका, नाशिक